सत्यमेव जयते

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

**पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.**

९३, मल्हार पेठ, सातारा.

दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३२२२५

ई-मेल आय डी- sp.satara@mahapolice.gov.in


जा.क्र/जिवानिशा/वाहतुक अधिसुचना/१३/२०२६ पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा दिनांक - १२/०१/२०२६

# अधिसुचना

दहिवडी पोलीस ठाणे हद्दीत दहिवडी ते गोंदवले बु// जाणारे रोडवर सार्वजनिक बांधकाम विभाग दहिवडी यांचे मार्फतीने पुलाचे काम सुरु असुन पुलाच्या रस्त्याचे क्रॉंक्रेटीकरणाचे काम करावयाचे सदरच्या पुलारील क्रॉंक्रेटीकरणाचे कामाच्यावेळी वाहतुक कोंडी होवु नये तसेच सदर कामाच्यावेळी प्रवाशांची गैरसोय होवु नये म्हणुन यासाठी दहिवडी बाजुकडुन गोंदवले बु// कडे जाणाऱ्या व येणाऱ्या वाहतुकीचे नियोजन होणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने पर्यायी मार्गाची उपलब्धता असलेने सदर मार्गावरील वाहतुक वळविणे आवश्यक आहे. त्याबाबतची अधिसुचना प्रसिद्ध करणेत येत आहे.

मी तुषार दोशी भापोसे, पोलीस अधीक्षक सातारा, मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३४ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारान्वये दहिवडी ते गोंदवले बु// या मार्गावरील पुलाच्या रस्त्याचे क्रॉंक्रेटीकरणाचे काम पुर्ण हाईपर्यत सदर मार्गावरील जाणारी व येणारी वाहतुकीत बदल करुन वाहतुक व्यवस्था सुरळीत राहणेकरीता दि. १३/०१/२०२६ चे ००.०१ ते ३१/०१/२०२६ चे २३.५९ वा. पर्यत खालीलप्रमाणे अधिसुचना पारित करीत आहे.

## वाहतुक मार्गातील बदलाबाबत

## वाहतुक मार्गातील बदल खालीलप्रमाणे करण्यात आला आहे.

१. दहिवडी बाजुकडुन गोंदवले बु// बाजुकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतुक ही मायणी चौक दहिवडी येथुन खांडसरी चौक मार्गे गोंदवले बु// अशी जाईल.

२. म्हसवड,गोंदवले बु// बाजुकडुन दहिवडी कडे जाणारी वाहतुक ही गोंदवले बु// येथील आप्पा महाराज चौकातुन पंढरपुर ते सातारा मार्गाने खांडसरी चौक मार्गे दहिवडी कडे जाईल.

३. दहिवडी येथुन गोंदवले बु// या मार्गावरील सर्व प्रकारची वाहतुक बंद राहील.

तरी वरील वाहतुक ज्या ठिकाणावरुन वळविण्यात आली आहे. त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. वरील वाहतुक मार्गात केलेल्या बदलांसाठी सर्व नागरीकांनी व वाहन चालकांनी नोंद घेवून पोलीस दलास सहकार्य करावे.

सदरची अधिसुचना माझ्या स्वाक्षरी व शिक्यानिशी दिनांक १२/०१/२०२६ रोजी जारी करण्यात आली आहे.

SUPDT. OF POLICE SATARA

(तुषार दोशी) भापोसे
पोलीस अधीक्षक सातारा

ठिकाण - सातारा
दिनांक - १२/०१/२०२६

प्रति,

१) मुद्रण व्यवस्थापक, कारागृह मुद्रणालय, पुणे
२/- महाराष्ट्र राजपत्रकामध्ये आदेश प्रसिध्द करुन प्रति रेकॉर्डकरता पाठविणेबाबत.

२) महाव्यवस्थपक (टनेल विभाग) महारेल पुणे.

Scanned with CamScanner

३) जिल्हा माहीती अधिकारी, सातारा यांना वृत्तपत्रात प्रसिध्दी करण्यासाठी.

४) संपादक/प्रतिनिधी, दैनिक ऐक्य, पुढारी, लोकसत्ता,लोकमत, तरुण भारत, सकाळ, सामना, ग्रामोध्दार, पुण्यनगरी, महाराष्ट्र टाईम्स, तिरंगा, मुक्तागीरी, जिव्हाळा यांना वृत्तपत्रात प्रसिध्द करणेसाठी

५) पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण, सांगली,

२/- सदर आदेशाची प्रसिध्दी आपल्या कार्यक्षेत्रातील स्थानिक वृत्तपत्रामध्ये करणेस विनंती.

६) सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा जिल्हा.

७) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सातारा जिल्हा.

<u>प्रत माहीतीसाठी सादर</u>

८) मा.विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापुर परिक्षेत्र कोल्हापुर.

९) मा.जिल्हाधिकारी सातारा.

१०) पोलीस अधीक्षक,महामार्ग परिक्षेत्र पुणे.

Scanned with CamScanner